Vol 4 Issue 2 Nov 2014

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

Ashok Yakkaldevi
A R Burla College, India

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies,
Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## Regional Editor

Manichander Thammishetty
Ph.d Research Scholar, Faculty of Education IASE, Osmania University, Hyderabad.

## *Advisory Board*

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.ror.isrj.org**

Review Of Research
ISSN:-2249-894X
Impact Factor : 2.1002 (UIF)
Vol. 4 | Issue. 2 | Nov. 2014
Available online at www.ror.isrj.org

# पेशवेकालीन समाज आणि अंधश्रध्दा

*प्राचार्य डॉ. बी.व्ही. चौधरी*
वसुंधरा कला महविद्यालय, जुळे सोलापूर, सोलापूर.

***सारांश :-***

१८ व्या शतकातील समाज जीवनाचा पाया हा धार्मिक व सामाजिक बंधनावर आधारित होता. त्यात समाजात निरक्षरतेचे प्रमाण अधिक होते. तळागाळातील समाज तर पूर्णतःच शिक्षणापासून वंचित होता. शिक्षण नाही, गरिबी आणि बंधने या खोडयात त्याचे जीवन बद्ध होते.

***प्रस्तावनाः–***

देवाधर्माच्या नावावरही अनेक प्रकारच्या अंधश्रध्दा समाजात रूढ झाल्या होत्या. जवळजवळ या काळातील सर्वच जातीधर्माचे लोक या अंधश्रध्दांचे बळी ठरत असत.

अंधश्रध्देला खरी सुरूवात ब्राह्मणवर्गाकडूनच होत असे. अज्ञानी माणसांना देवाधर्माची भीती दाखवून त्यांच्याकडून ग्रहशांती पूजापाठ आदी कर्मासाठी धन घेतले जात. म.फुले यांनी 'तृतीय रत्न' आणि 'ब्राह्मणाचे कसब' या ग्रंथातून समाजातील अंधश्रध्दा आणि ब्राह्मण वर्गाकडून होणारे प्रोत्साहन यावर टीकात्मक लेखन केले आहे.

ब्राह्मण ताईत भारून देत असत. भारून दिलेल्या ताईताला शत्रुचा स्पर्श झाला की तो आजारी पडून त्याचा मृत्यू होई अशी या काळात समजूत होती. दुसरा बाजीराव कैदेत असताना ताईत भारून देण्याचा प्रयोग सवाई माधवराव पेशवे यांच्यावर एका ब्राह्मणाकडून केल्याचा उल्लेख पेशव्यांच्या बखरीतून येतो.[१]

गावातील ग्रामजोशी पंचाग सांगणे, लग्न लावणे, अंत्य संस्कार करणे इत्यादी कामकाज करीत. देवापुढील दक्षिणा व इतर साहित्य त्यांना मिळत असे. पौरोहित्याचे कामही ग्रामजोशी करीत.

***गुरव*** : हे प्रत्येक कुलदेवतांची पूजाअर्चा करणे, देवापुढे दिवाबत्ती लावणे, शिवाजीची पूजा करणे, दक्षिणा घेणे, बेल-फुले व द्रोण-पत्रावळी करणे, वाजंत्री वाजविणे, नगारा वाजविणे, मंदिरात नंदा दीप लावणे अशी कामे करीत असत.

गोसाव्यात शैव आणि वैष्णव असे दोन वर्ग होते. त्यांचा पारंपारिक व्यवसाय भिक्षा मागणे असे. गोसाव्यांना समाज घाबरत असे. स्त्रियांना तर त्यांची फार भिती वाटत असे. गोसाव्यांना जादू-टोणा येतो व ते बायकांना किडा-मुंगी बनवितात असा समज होता. एका गोसाव्याने जादूटोणा केल्यामुळे त्यास धरून फाशी दिल्याची माहिती मुधोजी भोसले यांना कळविण्याची माहिती ऐतिहासिक कागदपत्रात आढळते.[२] स्मशानजोगी हे स्मशानात राहत असत. गावात भिक्षा मागायला येत. त्यांनाही स्त्रिया फार भीत असत. परंतु कोष्टी यांची भिक्षा ते घेत नसत.

मराठेकालीन समाजात भगत, पंचाक्षरी, देवऋषी यांच्यावर लोक विश्वास ठेवीत असत. त्यांनी दिलेल्या अंगाऱ्यामुळे रोग बरे होतात असा विश्वास होता. स्त्रिया मोठया प्रमाणावर त्यांच्या भजनी लागत.

अंगारा-धुपारा, अंगात येणे, सकुन पाहणे, कौल लावणे इत्यादी प्रकार समाजात सर्रास चालू

असे.

या काळातील भुते घालणे हा अघोरी प्रकार सर्वच समाजात दिसून येतो.

त्या काळात समाजात भूते घालण्याचा विश्वास होता. माळी समाजातील लोक भूते घालीत असत. माणिक माळयाच्या बायकोने भांडण झाल्यामुळे गोडाई माळणीवर भूते घातली होती. त्या गोडाई आजारी पडली असता तिने नोगोजी नाईकांचा अंगारा घेतला तेव्हा तिला बरे वाटले. नंतर मांत्रिकाने पाहिले असता माणिक माळयाच्या बायकोने भूते घातली असल्याचे आढळून आले. यावरून तत्कालीन समाजात माळी समाजातील स्त्रिया देखील भूते घालीत असत.[३] असे दिसून येते.

शिशाची यंत्रे बनवून आजार घालविण्याचा तोडगा केल्यास आजारी माणूस बरा होतो यावर तत्कालीन समाजाचा विश्वास होता. अशी यंत्रे सोनाराकडून बनवून घेतली जात. सोनार जातीचे लोक दुसऱ्याच्या वाईटाकरीता भूते घालीत असत. गणू सोनाराने कुसाजी जाधवाच्या घरावर भूते घातल्या असल्याचा उल्लेख पेशवा डायरीतून मिळतो.[४]

गावोगाव न्हावी असत. ते गावात हजामतीचा व्यवसाय करीत असत. वाजंत्री न्हावी व मशालजी न्हावी या त्यातील पोटजाती होत. काही न्हावी भूते घालण्याचे प्रकार करीत असल्याचा उल्लेख बाळाजी बाजीराव पेशवे यांच्या रोजकिर्दीत वाचावयास मिळतो. [५]

### *सुतार व लोहार गळ टोचीत :*

मराठाकाळात सुतार, लोहार यांनी तोफांचे गाडे, रथ बनविण्याची कामे केली. त्यांच्यातही अनेक पोटभेद आहेत. प्रत्येक गावात सुतार व लोहार यांची घरे असत. शेतीची अवजारे बनविणे हे त्यांचे मुख्य काम असे.

खंडेराव, भैरव देवांच्या यात्रेत गळ टोचण्याचे काम लोहार करीत असत. तसेच आपल्या मृत्यूपर्यंत प्रत्येक लोहाराने भूत किंवा देवदेवतांना जनावरांना बळी द्यावा अशी समजूत होती.

लोहारामध्ये बळी देण्याची प्रथा अतिशय क्रूर होती. नवस फेडतांना बळी दिल्या जाणाऱ्या पशूच्या डोक्यात घण घालून त्यास ठार मारीत.[६]

### *कुंभार :*

कुंभारांचा मूळ व्यवसाय गाडगी-मडकी तयार करणे, त्यांच्यातही अनेक पोटजाती आहेत. कुंभार मुंजाचा डहाका वाजवीत. काही भागात कुंभार भगत भूतांचा बंदोबस्त करीत. राघोबाचा मुलगा अमृतराव यास रात्रीच्यावेळी झोपेत भूत दिसत असे.[७] म्हणून त्यावर उपाय करण्यासाठी कोपरगावच्या नथू भगत कुंभाराला बोलावून त्या भूतांचा बंदोबस्त केला होता.

### *गोंधळी :*

महाराष्ट्रात माहूर, तुळजापूर भागात देवीचे गोंधळी असत. देवीची सेवा करीत. पूजेचा गोंधळ घालीत. नवीन जोडपे आपल्या कुलदेवतेचा गोंधळ घालण्यासाठी येत असत गोंधळी असे एका विशिष्ट जातीचेच असत असे नाही.

### *धनगर :*

धनगर जमात शेळया-मेंढया पाळीत. मेंढयांच्या लोकरीपासून घोंगडया विणीत. खंडोबा, विठोबा या त्यांच्या मुख्य देवता. काही धनगर आजारी माणसास औषधोपचारही करीत असत.[८]

भूते घालण्याचा प्रकार सर्रासपणे दिसून येतो. धनगर भोई, कोळी, महार, मांग, चांभार, मुलाणा, आदिवासी भिल्ल, गोंड दुबळा, गावीत, पावरा, रामोशी, ठाकुर, कैकाडी बेरड, पारधी वैदू, कोमटी, कोल्हाटी इत्यादी जमातींचा इतिहास जर आपण पाहिला तर अठराव्या शतकात या जमातीतील लोकांनी भूते घालण्याचा प्रकार केला आहे. जादूटोणा यावर त्यांचा विश्वास होता. देवदेवतांना नवस करणे व त्यासाठी पशूंचा बळी देणे हे प्रकारही मोठया प्रमाणावर समाजात रूढ होते.

मूठ मारणे, लोकांच्या घरासमोर काळीबाहुली-लिंबू पुरून तोडगा करणे असे कितीतरी प्रकार त्याकाळात समाजात होत असे. हे सर्व सामाजिक रूढी व अज्ञान यामुळे होत असावेत. त्याकाळातील बहुतेक समाज अंधश्रद्धाळू होता हेच दिसून येते. एवढेच नाही तर या अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचे

काम पेशव्यांनीही अनेकवेळा केलेले त्यांच्या कागदपत्रातून दिसून येते. या अंधश्रद्धेच्यापायी सर्वात जास्त बळी स्त्रियांचाच जात असे.

***बळी देण्याची प्रथा :***

तत्कालीन समाजात देवधर्म भोळेपणा टोकाला गेला होता. त्यातूनच अंधश्रद्धा वाढत होती. लोक स्वकल्याणासाठी अंधश्रद्धेचा मार्ग पत्करीत असत.

ग्रामदेवतांना प्रसन्न करून घेण्यासाठी त्यांना बळी दिले जात. दसऱ्याच्या दिवशी ग्रामदेवतांना बकऱ्याचा बळी देत. नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगीही बळी देण्याच्या प्रथा होती. बळी दिल्या जाणाऱ्या पशूंमध्ये बकरा, कोंबडे यांचा समावेश होता. विशिष्ट प्रसंगी बांधकामात मानवाचा बळी देत. त्यात खालच्या जातीच्या स्त्रियांचा बळी देण्याचे हे प्रकार अत्यंत घृणास्पद होते.

१८ व्या शतकातील महाराष्ट्रीयन समाजात दसऱ्याच्या सणानिमित्त वेशीवर बळी देण्याची प्रथा होती. बकरा बळी देण्याचा हा हक्क दरसालाप्रमाणे आपलाच चालावा या करीता पेशवे सरकारला कळविले जाई. सवाई माधवरावाच्या काळात सूपे परगाण्यातील पणदरे येथील अभिमनराव जगताप पाटील हे दसऱ्याच्या दिवशी गावाच्या वेशीत दरवर्षी बळी देत होते. हे सदर पत्रावरून लक्षात येते. गेल्या वर्षी आपणच बकरा मारला होता. परंतु या वर्षी मात्र गावातील भाऊबंदकीतील लोक भांडण करतील म्हणून त्यांना ताकीद देऊन दरवर्षीप्रमाणे चालत आलेली प्रथा पुढे चालवावी असे पत्र अभिमनराय जगताप पाटील९ यांनी पेशवे सरकारला दिले होते.

काही गावामध्ये दसऱ्याच्या दिवशी रेडयाचा बळी दिला जात असे. बळी देण्याची प्रथाही फार विचित्र होती. बळी दिला जाणारा रेडा गावात मिरवीत आणून त्याचा देवीसमोर बळी दिला जाई. बळी देतांना एका झटक्यात त्यांचे मुंडके छाटले गेले पाहिजे असा रिवाज होता.

कसबे त्रिंबक येथील देवीस दसऱ्याच्या दिवशी रेडा बळी देण्याची प्रथा होती. परंतु पुढे ही प्रथा बंद पडली. त्यामुळे कसब्यातील लोकांना स्वप्ने पडू लागली. तेव्हा कसब्यातील ब्राह्मणवर्गाने पेशवे सरकारला ही प्रथा सुरू करण्याची गळ घातली. तेव्हा पेशव्यांनी कसब्यात रितीरिवाजाप्रमाणे दरवर्षी दसऱ्याच्या दिवशी देवीस एक रेडा बळी देण्याची सनद कसब्याच्या अमलदारास दिली.[१०]

यावरून स्वतः पेशवेच ब्राह्मणांच्या सांगण्यावरून समाजात अंधश्रद्धेला खतपाणी घालीत होते असे दिसते.

बळी देण्याचा हा प्रकार राज्यकर्त्यांकडून केला जात असे. होळी, दसरा आदी सणाच्या निमित्ताने हमखास असे बळी दिले जात. राजश्री मुधोजी भोसले यांनी होळीची पूजा करून त्यात दोन जिवंत बकरे बळी दिले होते.

बळी दिलेल्या बकऱ्यावरून समाजात मानापानाचे वाद होते व ते मिटविण्यासाठी पेशवे दरबारी दाद मागितली जात असे आणि पेशवेसुद्धा तो वाद बळी दिलेल्या बकऱ्याची मुंडी घेण्याचा मान ज्याला त्याला आज्ञा काढून देत असत. गरेघर येथे भरणाऱ्या यात्रेत बळी दिल्या जाणाऱ्या बकऱ्याची मुंडी घेण्याचा मान कवडे देशमुख यांचा होता. तो त्यास वहिवाटीप्रमाणे देणेविषयी पेशवे सरकारकडून आज्ञा झाल्याचे ऐतिहासिक कागदपत्रातून स्पष्ट होते.[१२]

***करणी–तोडगे :***

समाजात जीवनात करणीतून मुक्तता मिळावी म्हणून काही तोडगे केले जात. कोंबडीची अंडी, बकऱ्याची मुंडी ओवाळून जमिनीत पुरीत. रघुजी भोसलेच्या रखेलीचा मुलगा गेंदूराजा झाडावरून खाली पडला असता त्याला काही तरी लागण म्हणजेच करणी झाली असे समजून कोंबडीची अंडी व बकऱ्याची मुंडकी त्याच्यावरून ओवाळून जमिनीत पुरल्याचे[१३] ऐतिहासिक कागदपत्रातून दिसून येते.

***दृष्ट लागणे :***

तत्कालीन समाज जीवनात लहान बाळास व सुंदर मुलीस दृष्ट लागण्याचे प्रकार होत असत. ही अंधश्रद्धा सर्वच जातीत जमातीत होती. दृष्ट लागल्यावर म्हणजेच नजर लागल्यावर ती काढण्याचे वेगवेगळे प्रकार अवलंबिले जात. मीठ–मोहऱ्या, मिरच्या नजर लागलेल्या व्यक्तीवरून ओवाळून टाकीत असत.

याशिवाय दृष्ट मण्यांची माळ गळयात घालीत असत. इतरही अनेक तोडगे केले जात. व्रजावळ मण्यांची माळ दृष्ट लागलेल्या माणसाच्या गळयात घातल्याचे[१४] ऐतिहासिक कागदपत्रातून दिसून येते.

नागपूरकर रघुजी भोसलेचा मुलगा परसोजी भोसले हा आजारी पडला असता त्यात त्याला मुळव्याधीचा त्रास सुरू झाला. तेव्हा त्याला दृष्ट लागली असे समजून एक अजबच तोडगा केल्याचे ऐतिहासिक कागदपत्रावरून दिसून येते. त्या मुलाच्या हस्ते काळी झूळ घातलेला हत्ती, ढाल, तलवार, कटयार व रूपयाचा तोडा याबाबत काळी वस्त्रे१५ ब्राह्मणाला देऊन त्याला गारदी लोकाकरवी गावाच्या शिवेबाहेर काढण्यात आल्याचे दिसून येते.

### *मृत पिंडास काक स्पर्श :*

मृत व्यक्तीच्या पिंडास कावळयाने स्पर्श केला पाहिजे असे समज जवळजवळ हिंदू धर्मातील सर्वच जातीत होती. बऱ्याचवेळा कावळा पिंडास स्पर्श करीत नाही तेव्हा मृताचे नातेवाईक पिंडाला नमस्कार करून मृतांच्या ज्या काही आशा राहिल्या असतील त्या पूर्ण करण्याचे आश्वासन देत. त्यांच्या मुलाबाळाकडे लक्ष देण्याचे आश्वासन देत असत. तरीही पिंडाला काकस्पर्श झाला नाही तर ब्राह्मण दर्भाचा काकस्पर्श करून तोडगा काढीत व पुढील विधी करण्यास यजमानांना मोकळीक देत असत. पिढयानं पिढया ही प्रथा दशक्रिया विधी, श्राध्दादि विधीच्या प्रसंगी चालूच आहे. आजही समाज या विधीतून मुक्त झाला नाही.

गजराबाईच्या निधनानंतर सगळी क्रियाकर्मे परसोजी भोसले करीत होते. दशपिंडविधीच्या वेळेस त्यांनी कावळयाकरिता पिंड ठेवला व वाट पाहत बसले. तेव्हा अडीच प्रहरापर्यंत काकस्पर्श न झाल्याने१६ ऐतिहासिक कागदपत्रातून दिसून येते.

पिंडाला काकस्पर्श न झाल्याची अनेक उदाहरणे पेशवे दप्तरातून दिसून येतात. हाही एक अंधश्रध्देचा भाग होता, अतृप्त मृतात्म्यांच्या पिंडाला काकस्पर्श करीत नाही.

### *भाग बांधणे :*

१८ व्या शतकातील संपूर्ण समाजजीवनच अंधश्रध्देच्या चक्रव्यूहात सापडलेले होते. त्यात स्त्रियांचा भाग फार मोठा होता.

ग्रामदेवतेचे पुजारी कोणावर काही संकट आले तरी ते निवारण्यासाठी ग्रामदेवतेला प्रसन्न करून घेण्यासाठी देवाला नवस बोलावयास लावीत व तो नवस पूर्ण होईपर्यंत काही रक्कम अनामत म्हणून भाक बांधून ठेवीत.

रामचंद्र नाईक वानवले या अंधश्रध्द सावकाराने माहूरला देवीच्या दर्शनासाठी जाण्याचे ठरविले. परंतु काही कारणामुळे त्याचे जाणे झाले नाही. तेव्हा त्याचे पाय दुखू लागले.[१७] या दुखण्याचा संबंध त्याने उपरोक्त कारणाशी जोडून रूपयाचा भाक बांधला. त्याचे पाय दुखणे थांबले होते.

### *हीव बांधणे :*

इतर तोडग्याप्रमाणे त्या काळात हीव बांध्याचा तोडगाही केला जाई. 'शेणवाईकर वासुदेव बाबा हे हीव बांधण्याचा तोडगा करतात. म्हणून पंचरंगी रेशमी, उद्, उडीद व काळे सूत असे साहित्य घेऊन जाणे१८ असा उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रात वाचावयास मिळतो.

### *दैवी चमत्कार :*

१८ व्या शतकातील समाजजीवनाचा दैवी चमत्कारावर फार चटकन विश्वास बसत असे. देवाच्या अंगातून घाम येणे, डोळयांतून पाणी येणे, मनुष्यवाणीतून पशूंचे संभाषण ऐकू येणे, पिंडीतून ध्वनी येणे असे हे चमत्कार असत. असे चमत्कार घडले तर त्याचा अर्थ सामाजिक जीवनाशी लावून लगेच काहीतरी अरिष्ट येणार म्हणून मोठया प्रमाणावर पूजा-अर्चा करीत असत.

त्र्यंबकेश्वर येथील श्री महादेवक्षेत्र हे ज्योतिर्लिंग असून मराठाकालीन महाराष्ट्रीय समाजात एक जागृत देवस्थान म्हणून त्र्यंबकेश्वराला महत्त्व होते. या देवस्थानात अनेक प्रकारचे चमत्कार होते. पश्चिमेकडील लिंगातून ज्योती निघण्याचा व नाद आणि शब्द निघणाऱ्या चमत्काराचे वर्णन कागपत्रांतून येते.[१९]

१८ व्या शतकातील समाजजीवनात विविध प्रकारच्या अंधश्रद्धा प्रचलीत होत्या. विशेष म्हणजे या अंधश्रद्धांना खतपाणी घालण्याचे काम राजकर्तेही करीत असत.

नैसर्गिक आपत्ती, वैयक्तिक संकट, आजार या सर्वांचा संबंध अंधश्रद्धेशी लावून त्यावर तोडगे बांधले जात. ताईत, कंठे, अंगारा-धुपारा इत्यादी प्रयोग केले जात. तळागाळातील लोकजीवनावर व स्त्रियांवर या अंधश्रद्धेचा फार लवकर प्रभाव पडत असे.

शकून-अपशकून यावर विश्वास असे. अपशकून घडल्यास लगेच त्यावर शास्त्रमत घेऊन तोडगा काढला जात असे. मांजर आडवी जाणे, अंगावर पाल पडणे, डावा डोळा स्फुरणे, हात खाजवणे असे कितीतरी अपशकून व शकूनाचे प्रकार समाजात प्रचलीत होते व ते कसोशीने पाळले जात. मुहूर्त पाहूनच राजकर्ते कार्यासाठी निघत असत. समाजातही मुहूर्ताला विशेष प्राधान्य होते.


१) कुलकर्णी अ.रा. — शिवकालीन महाराष्ट्र पृ. क्र. ३१

२) हेरवाडकर, द.वि. — 'पेशव्यांची बखर', मुंबई पृ. क्र. १६२

३) अप्रकाशित कागदपत्रे — दप्तर क्र. पुडके क्र. १. पत्र क्र. वाय सिरीज १७८३२ पुरार्भिलेखाकर पुणे.

४) ओतुरकर, रा.वि. — 'पेशवेकालीन लोकभ्रम' भारतीय इतिहास आणि संस्कृती' त्रैमासिक पुस्तक ३५ वे वर्ष ६ वे.

५) वाड, जी.सी. — 'पेशवा डायरी खंड २', 'छत्रपती शाहू' पृ. क्र. १६४.

६) तत्रैव — लेख ६३, उपरोक्त पृ. क्र. ६१-६३

७) जोशी महादेवशास्त्री — 'भारतीय संस्कृती कोश', खंड-८ पुणे पृ. कृ. ४४८.

८) भावे वा. कृ. — 'पेशवेकालीन महाराष्ट्र' भारतीय अनुसंधान परिषद दिल्ली, प्र. आ. १६७२, पृ. क्र. २१७.

६) चितळे, विष्णू सिताराम — पेठे दप्तर भाग-२, भा.इ.सं.म'., पुणे. पृ. ११२

१०) वाड जी.सी. — पेशवेशवायरी, खंड ८ ले. १११२, पृ. २५७.

११) शेजवळकर, त्र्यं.शं. — नागपूर अफेअर्स, खंड-१, पुणे डेक्कन कॉलेज १६५२, पृ. २६७-६८.

१२) अप्रकाशित कागदपत्रे — चिटणीस दप्तरांतील कागदपत्रे, रूमाल क्र.४ पुडके क्र. १ पत्र क्र. २२६६५, पुराभिलेखागार, पुणे.

१३)अप्रकाशित कागदपत्रे — द.क्र.३२, पुडके, अ.१ पत्र क्र. वाय सिरीज१७७७५ पुराभिलेखागार, पुणे.

१४) चाफेकर, ना.गो. — 'पेशवाईच्या सावलीत', पुणे मा.ई.सं.म., १६५६, ृ. १८०.

१५) शेजवलकर, त्र्यं.शं. — नागपूर अफेअर्स, खंड-१, के. २६६, पृ. ३८०.

१६)तत्रैव — ले. २८८, पृ. ३३६.

१७)राजवाडे संशोधन मंडळ — 'संशोधक त्रैमासिक' १६६०, वर्ष ५८.

१८)भारतीय इतिहास आणि संस्कृती — त्रैमासिक पुस्तक ३५ वे वर्ष ६ वे, पृ. ४२.

१६ अप्रकाशित कागदपत्र — त्रिंबक दप्तर य.न.केळकर खाजगी संग्रह रूमाल क्र. ११/१२ पत्र क्र. २१३४. पुरालेखागार, पुणे.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.ror.isrj.org